ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

## लातूर समाचार

### शेतकऱ्याबाबत कोरडी आपुलकी नको...

राज्यात कोसळलेल्या पावसाने मोठे नुकसान केले. हे सर्वजन मान्य करतात, निसर्गाची किमया भारी असते हे संकटावरून दिसून आले. भर उन्हाळ्यात पाऊस झाला, सप्टेंबर महिणा हा शेतीतील उत्पन्न काढण्याच महिणा, मात्र या सप्टेंबर महिण्यातच पावसाने कहर केला. एवढा कहर केला की, शेतीतील आहे तेवढे पिकाचे नुकसान केले. जमीनवरील माती वाहून गेली, जनावरे मृत्युमुखी पडली. सर्व काही शेतकऱ्याचे आहे तेवढे निसर्गाने हिराऊन घेतले. विशेष करून मराठवाड्यातील शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. यानंतर सर्व शेतकऱ्यास दिवाळीपुर्वी मदतीचे आश्वासन दिले असले तरी सर्व शेतकऱ्यापर्यंत सरकारची मदत मिळाली नाही. आता कोठे केंद्रिय पथकाने धाराशिव जिल्ह्यात हजेरी लावली आहे. पहाणी पथक नुकसानीची माहिती सादर करतील, त्यानंतर मदत मिळेल. या बाबत आता शेतकऱ्यांना भरोसा नाही. तातडीने मदत देणे अपेक्षित असताना याला विलंब लागतो आहे. आता तर विरोधीनेते उद्धव ठाकरे यांचा दौरा झाला, यात त्यांनी कर्जमाफीची मागणी केली. शेतकऱ्याबाबत जिव्हाळा दाखविला. जोरदार भाषणे केली. ठाकरे शैलीत भाषणामुळे टाळ्याही मिळाल्या. शेतकऱ्याचा पाठींबा संवादच्यावेळी मिळाला. मुळात ज्यावेळी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी कर्जमाफीचा धाडसी घेऊ शकले असते. वास्तविक पुर्वी काँग्रेस व राष्ट्रवादीचे सरकार सत्तेत दिर्घ काळ होते. त्यावेळी शेतकऱ्याचा सातबारा कोरा म्हणजे कर्ज माफी करणे आवश्यक होते. भाजपा व शिवसेना सत्तेत आली, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शरद पवार सह काँग्रेसचे सरकार सत्तेत आले होते. त्यांनी माफी दिली नाही. त्यानंतर आता भाजपाचे सरकारमध्ये अजित पवार व एकनाथ शिंदे आहेत, त्यांच्या सरकारने दिवाळीपुर्वी मदतीचे आश्वासन दिली. आता तुळशीचे लग्न झाले तरी मदत मिळेल या आशेवर शेतकरी जीवन जगत आहेत. त्यामुळे शेतकऱ्याचा खरा वाली आहे का नाही अशी वाटणे स्वाभाविक आहे. शेतकरी हा कष्टाळू आहे. खर्च कमी करणारा आहे. जो मेहती असतो त्याला कर्ज काढण्याची सवय नसते. मग कर्जबाजारी कोणी केले यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. कर्जाची सवय कोणी लावली यावर विचार केला तर अनेक बाबी कळून येतील. वास्तविक जे लहान शेतकरी आहेत. प्रामाणिक आहेत. गरीबीचे जीवन जगतात. अशा शेतकऱ्याकडे कर्ज मोठे नाहीत. जे शेतकरी पुढारी आहेत. त्यांच्याकडे अधिक जमीन आहे. असे शेतकऱ्याकडे थकबाकीदार असू शकतात. सोसायटी कर्ज किती देते पाच ते पंधरा हजारापेक्षा अधिक देत नाहीत. मुळात बँका कर्ज कोणाला देतात यावर नजर टाकली तर जो सदन शेतकरी आहे त्यांना देतात हा अनुभव जवळपास सर्वांना आला आहे. त्यामुळे शेतकऱ्याकडे कर्ज असेल मात्र एखाद्या बुडव्या उद्योगपती पेक्षा कितीतरी पटीने कमी असेल यावर विचार केला पाहिजे. त्यामुळे सत्ताधारी असो विरोधक असो यांना शेतकऱ्याविषयक खराच कळकळा आहे का देखाला हेच कळून येत नाही. ज्यावेळी हातात होते त्यावेळी कोणीही कर्जमाफी केली नाही आता मात्र राजकारण करीत असतील तर शेतकऱ्यांनी ओळखले पाहिजे. हा ढोंगीपना आहे का? खराच कळकला आहे! ओळखण्याची गरज आहे. मुख्यमंत्री आले का माजी मुख्यमंत्री आले किंवा आजी उपमुख्यमंत्री आले का? माजी! या पेक्षा शेतकऱ्यासाठी सत्तर वर्षात काय केले याचा लेखाजोखा जाहिर मांडला पाहिजे. केवळ शेतकऱ्यासाठी रिकामा पुळका दाखविणे बंद केले पाहिजे. कर्ज माफीसाठी किती रक्कम असू शकते याचा अंदाज घेतला तर देशाला बुडऊन परदेशी पळून गेलेले जे कर्ज-बँका बुडविणारे यांच्याकडे किती रक्कम होती? याचा विचार केला पाहिजे. शेतकऱ्याला काही द्यायचे झाले तर केवळ विचार केला जातो. सत्ताधारी व विरोधी यांच्यात शेतकऱ्याविषयी जिव्हाळा असला पाहिजे. ते सध्याला दिसून येत नाही. शेतकरी एवढे नुकसान झाले तरी त्यांनी आंदोलन किंवा मोर्चा काढला नाही. वेतन आयोगाची मागणी केली नाही. खरीप हाताचे गेलेच आहे आता रब्बीची आशा मनात धरून कामाला लागला आहे. शेतात पाणी आहे. जमीन नापीक होण्याची भिती आहे. शेतात वाफसा होत नाही. पाळी मारणे अशक्य दिसून येत आहे. त्याच प्रमाणे खरीपाचे पीक गेले तसे रब्बीचे हाती लागेल याचा भरोसा नाही. तरी मोठ्या आशेने कामाला लागला आहे. वास्तविक शेतकऱ्यावरील संकट एकट्या सरकारने संपेल असे नाही. सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. सामाजिक संस्था असोत किंवा सर्वात महत्वाचे साखर कारखान्यांने शेतकरी ऊस उत्पादक सभासदांना मदत केली पाहिजे. एखाही साखर कारखान्याने मदतीचा हात पुढे केला नाही असेच चित्र दिसून येते. वास्वविक किमान काही शेतकऱ्यास साखर कारखान्याने मदत करणे अपेक्षित होते. साखर कारखान्याकडे सभासद शेतकऱ्याची नावासह यादी, बँकेचे डिटेल आहे. त्यांनी थोडाफार हात भार लावणे अपेक्षित होते. तशा सुचना सरकारने देणे उचित होते. तसे झाले नाही. या नुकसान भरपाई बाबत सर्वजन चर्चा करतात, मागणी करतात. त्याच प्रमाणे कळकला निर्माण करतात. राज्यात विरोधकांची म्हणावे तसे वजन दिसून येत नाही. नुसता दौरा करून काय उपयोग? त्याची दखल घेणे उचित आहे. असे असताना केवळ दौरेच होत आहेत. पंचनामे पुर्ण नाहीत. केंद्रिय पथकास आता कोठे जाग आली आहे. त्याच प्रमाणे तसे पाहिले तर सत्ताधारी बरोबर विरोधकांना जी कळकळा किंवा आस्था असावयास पाहिजे ती कमी दिसून येते. आज पर्यंत माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री सारखे जीवन जगणारे व शेतकऱ्याविषयक प्रेम असणारे दुसरे नेतेच नाहीत. कर्ज माफी बरोबर शेतकरी कर्जबाजारी होऊ नये या बाबत निर्णय घेणे अपेक्षित आहे. शेतकरी का कर्जबाजारी झाला यापेक्षा सध्याला पावसाने झालेल्या नुकसानीतून बाहेर कसे काढता येईल याचा विचार केला पाहिजे. कर्जबाजारी शेतकरी होवू नये याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. आता केवळ शेतकऱ्याविषयक देखावा दिसून येत आहे. मनापासून संकटातून मुक्त करणे वाटत नाही. असा देखावा करणाऱ्यास आता शेतकऱ्यांनी ओळखणे आवश्यक आहे.

# पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे



**गर्भलिंग निवड**

पोटातील गर्भाचं लिंग जाणून घेणं आणि जर ती मुलगी असेल तर गर्भपात करणं म्हणजे गर्भलिंग निवड

गेल्या काही वर्षात गर्भाचं लिंग जाणून घेण्यासाठी सर्वात जास्त वापरलं जाणारं तंत्रज्ञान म्हणजे अल्ट्रासाउंड सोनोग्राफी आणि मुलगी असेल तर नंतर गर्भपात १९८० नंतर सोनोग्राफीचं तंत्रज्ञान सर्वदूर पसरलं, परिणामी गर्भलिंग निदानात वाढ झाली आणि ०-६ वयातील मुलींची संख्या झपाट्याने खालावू लागली.

०-६ वयोगटातील लिंग गुणोत्तर

०-६ वयोगटातील दर हजार मुलांमागे असणारी मुलीची संख्या मोजून लिंग गुणोत्तर काढलं जातं. भारतामध्ये हे गुणोत्तर दिवसेंदिवस विषम होत आहे. २०१९ मधील ९२० पासून २०२३ मधील ९०७ पर्यंत मुलींची संख्या कमी झाली आहे. जगभरातले अनुभव पाहता स्वाभाविक लिंग गुणोत्तर १५० हुन जास्त हवे. ही तफावत पाहता गर्भलिंग निदान आणि मुलीकडे केलं जाणारं दुर्लक्ष यामुळे मुलींची संख्या घटत आहे हे दिसतं. जेव्हा जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर काढल आतं (दर हजार मुलांमागे जन्माला येणा-या मुलींची संख्या) तेव्हा जन्माच्या आधी केलं जाणार गर्भलिंग निदान उघडपणे कळतं. जन्माच्या वेळच्या लिंग गुणोत्तरावरुन प्रसवपूर्व गर्भलिंग निदान होत असल्याचं स्पष्ट होतं तरी, देशभरासाठी आणि जिल्हापातळीवरील आकडेवारी कळत असल्याने ०-६ वयातील लिंग गुणोत्तर जास्त प्रमाणावर मान्य केलं जात.

**गर्भलिंग निदान का होतं?**

गर्भलिंग निवड म्हणजे केवळ तंत्रज्ञानाचा गैरवापर इतकंच नाही. मुली आणि स्त्रियांना दिलं जाणारं दुय्यम स्थान आणि आयुष्यभर त्यांना सहन करावा लागणारा भेदभाव, याच्या मुळाशी आहे. समाजाची आणि कुटुंबाची पुरुषप्रधान रचना आणि मुलाचा हव्यास वा संदर्भामध्ये या प्रश्नाचा विचार करायला हवा. तसंच हुंडा आणि मुलीकडे परक्याचं धन म्हणून पाहण्याची वृत्ती यामुळेही मुलींचा विचार ओझं म्हणूनच केला जातो.

मुलीबाबत होणार दुर्लक्ष किंवा भेदभाव अनेक प्रकारचा आहे. अपुरा आहार, आरोग्य किंवा शिक्षणापासून वंचित ठेवणं आणि कुटुंबात होणारी हिंसा, याचंच तीव्र स्वरुप म्हणजे मुली नकोशा होणं किंवा गर्भलिंगनिदानाचा वापर करुन मुलींना जन्मालाच न घालणं.

**गर्भलिंग निदानाचे परिणाम**

विषम लिंग गुणोत्तरामुळे निसर्गाच सूक्ष्म संतुलन ढळू शकतं तर समाजाचा नैतिक ताणाबाणा बिघडून जाऊ शकतो. मुली कमी असल्या तर त्यांचा दर्जा किंवा स्थान सुधारेल हा काहींचा समज खरा नाही. उलट स्त्रियांवरील अत्याचारात भरच पडेल. बलात्कार, स्त्रियांचं अपहरण, देहविक्रय आणि एका स्त्रीशी अनेकांचा विवाह (बहुपतीत्व) या सर्वांत वाढच होऊ शकते. देशाच्या काही भागात तर आताच स्त्रिया वस्तूप्रमाणे विकत घेतल्या जात आहेत.

**गर्भलिंग निवड बेकायदेशीर आहे**

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व तंत्रज्ञान (गर्भलिंग निवडीस प्रतिबंध) हा कावदा नर्भधारणेच्या व प्रसूतीच्या आधी गर्भ- लिगनिवडीला आळा घालतो, १९९४ साली हा कायदा अस्तित्वात आला व २००३ मध्ये त्यात सुधारणा झाल्या. गर्भाचं लिंग जाणून घेण्यासाठी सोनोग्राफीसारख्या तंत्रज्ञानांच्या वापरावर नियंत्रणाचं काम हा कायदा करतो. काही वैद्यकीय कारणं वगळता गर्भाच लिंग माहित करून घेणं बेकायदेशीर आहे. पहिल्या गुन्ह्यासाठी कायद्यामध्ये ३ वर्षांपर्यंत कैद आणि १०,००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा आहे, अंमलबजावणीतील अडचणींमुळे आतापर्यंत फारच कमी जणांना शिक्षा झाली आहे. वैद्यकीय व्यावसायिक आणि आई-वडील वा दोघांच्या संगनमतातून गुन्हा घडत असल्याने तो सिध्द कसा करायचा हे मोठे आव्हान आहे.

**याबाबत जनजागृती**

पालक, भाऊ, बहीण, कुटुंबातील सदस्य आणि मित्र मैत्रिणी या नात्याने आपल्या प्रत्येकाचीच यामध्ये काही निश्चित भूमिका आहे. त्याचसोबत आपल्या कामाचा भाग म्हणूनही आपण जागरुक रहायला हवं, शिक्षक, डॉक्टर, वकील, न्यायाधीश, स्वयंसेवी कार्यकर्ते, सरकारी अधिकारी, विधीज्ञ, लोकप्रतिनिधी, पत्रकार, कलाकार कुणीही असलो तरी आपण काही गोष्टी नक्की करु शकतो.

आपल्या घरी, शेजारी-पाजारी, समाजात व कामाच्या ठिकाणी या विषयाबाबत जागरुकता निर्माण करा.

भेदभावाचा विरोध करा. उदा. मुली आणि स्त्रियांवरील हिंसा सहन करु नका. हुंडा देऊ किंवा घेऊ नका, आणि संपत्तीत समान हक्काचा आग्रह धरा. आपल्या आसपास मुलगे आणि मुलींमध्ये समानता आणण्यासाठी प्रयत्न करा. कायद्याचं उल्लंघन होतंय असं लक्षात आल्यास समुचित अधिकाऱ्यांना कळवा. समाजात गर्भलिंगनिवडीविरोधात जागृती करणाऱ्या गटांशी जोडून घ्या. त्यांना मदत करा.

गर्भलिंगनिवड करु नका ! त्याला मान्यता देऊ नका । आणि निमूटपणे पाहत राहू नका.गर्भ लिंग निदान प्रतिबंध, लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्याठी आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सावजानिक आरोग्य विभागामार्फत खबरी योजना रु. १,००,०००/- बक्षीस.

जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी, गर्भलिंग निदान प्रतिबंध आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित कायदा २००३ (पीसीपीएनडीटी आणि एमटीपी ) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग महत्वाचे पाऊल.

या कायद्याअंतर्गत तक्रार नोंदविण्यासाठी महाराष्ट्र राज्य पीसीपीएनडीटी टोल क्रमांक १८००२३३४४७५/१०४ आहे. तक्रार नोंदविण्यासाठी तसेच संकेचे निरसन करण्यासाठी संकेतस्थळ http://amchimulgimaha.in या संकेतस्थळावर व महाराष्ट्र राज्य पीसीपीएनडीटी टोल क्रमांकावर कोणीही तक्रार नोंदविल्यास ती तक्रार गोपनीय राहील. तक्रार देणाऱ्यास त्याची इच्छा असल्यास त्याचे नाव देखील नोंदवू शकतील.

पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत तक्रार निपटारा होऊन गर्भलिंग निदान करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल होणार. तक्रारीची अंमलबजावणी होऊन जर स्त्री भ्रूणहत्या रोखण्यास यश आहे तर तक्रारदारास शासनामार्फत खबरी योजनेअंतर्गत रक्कम रुपये १,००,०००/- बक्षीस आहे.

मुलगी वाचवा

प्रसवपूर्व गर्भलिंग निदान करणे कायद्याने गुन्हा आहे.

**डॉ. संजय एम. पेरके**
**जिल्हा समुचित प्राधिकारी तथा जिल्हा शल्यचिकित्सक नांदेड**

# वार्षिक क्रीडा महोत्सवाची दिमाखदार सुरुवात



**लातूर/प्रतिनिधी** : येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक क्रीडाउत्सवाची दिमाखदार सुरुवात करण्यात आली. प्रमुख अतिथी डॉ. हसनाले यांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रसंगी उपस्थितचेअरमन आनंदजी लाहोटी,आशिषजी अग्रवाल, आशिषजी सोमाणी, प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू, कुलपती प्रवीणजी,शिवनगीकर उपस्थित होते.

महिलांनी आणलेला विश्वचषक प्रेरणादायी- डॉ. हसनाले

प्रस्तुत प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ हसनाले यांनी जीवन जगत असताना निसर्ग आणि शारीरिक आरोग्य यांचे संतुलन करून जगा असे उदबोधनही याप्रसंगी यांनी केले. शाळेचे मैदान उत्तम दर्जाचे असल्याचे सांगितले यावरून येथील विद्यार्थ्याला उच्दार्जाचे शिक्षण व खेळ मिळतात. येथील विद्यार्थी नक्कीच आपल्या शाळेचे नाव लौकिक करेल. भारतीय महिलांनी आणलेला विश्वचषक येथील विद्यार्थांना प्रेरणा देईल. विद्यार्थाने आपल्या वेळेचे महत्व जाणून शिक्षण आणि खेळ यात करियर करावे.

स्वातंत्र्याची प्रेरणा बनलेले वंदे मातरम् या गीताला १५० वर्ष पूर्ण झाले.बंकिमचंद्र चटर्जी लिखित वंदे मातरम या गीताच्या सार्धशताब्दी सोहळ्यानिमित्त संपूर्ण वंदे मातरम् राष्ट्रगीताचे गायनही विद्यार्थ्यांनी केले. विद्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज आर्यभट्ट सम्राट अशोक आणि चाणक्य अशा चार गटांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले सुंदर असे पथसंचलन, तिरंगी फुग्यांची आकाशी उधळण आणि क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनाची मशाल या सुंदर वातावरणाने विद्यालयाचा परिसर फुलून आला होता.

सर्वप्रथम विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी मल्हार बगाटे यांनी क्रीडा महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांकरवी शपथ घेतली. बास्केटबॉल फुटबॉल डॉजबॉल क्रिकेट व्हॉलीबॉल अशा अनेक खेळांचे आयोजन या महोत्सवात करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवानिमित्त शाळेतील १६८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती मुंदडा आणि मैथिली सूर्यवंशी यांनी केले. इंग्रजी विभाग प्रमुख राणी आमले यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी विद्यालयाचे संस्था पदाधिकारी, प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्व्ही, माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे, वर्षा खुंटेगाव मनीषा मगर रेश्मा काळे मंजुषा भोसले सुनील मुनाळे शैलेंद्र डावळे, प्रियंका गडदे, मयुरी बिराजदार, सुनिता झुंजे,महेश सर, भागवत सर व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# कुष्ठरुग्ण शोध अभियान

कुष्ठरुग्णांचा प्रसार थांबविण्यासाठी शोध मोहिम १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ सहसंचालक आरोग्य सेवा, (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे यांच्या आदेशान्वये कुष्ठरुग्ण शोध मोहिम आपल्या जिल्हयात दि.१७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या दरम्यान राबविण्यात येणार आहे. सन २०२७ पर्यत शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उदिद्ष्ट केंद्र शासनाने निश्चित केले आहे. हे उदिद्ष्ट साध्य करण्यासाठी समाजातील सर्व लपलेले कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणणे आवश्यक आहे. त्याकरिता या मोहिमेअंतर्गत सर्वेक्षणामध्ये कुष्ठरुग्ण तपासणी आशा व पुरुष स्वयंसेवक यांच्या पथकाद्वारे संपुर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. याबाबत सविस्तर माहिती हवी असल्यास सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), जालना यांना संपर्क साधावा.

**लक्षणे** :- त्वचेवर लालसर फिकट न खाजणारा, न दुखणारा, बधीर चट्टा, तेलकट त्वचा, त्वचेवर गाठी, कानाच्या पाळ्या जाड होणे, त्वचेला थंड व गरम संवेदना न जाणवणे, हाता पायाची बोटे वाकडी, मज्जातंतु जाड होणे व मज्जासंस्थेचे रोग. असे लक्षणे आढळुन आल्यास शासकिय रुग्णालयामध्ये तपासणी करुन घ्यावी. रोगनिदान व औषधोपचार शासकिय रुग्णालयामध्ये मोफत आहे.

**प्रसार** :- कुष्ठबाधित रुग्णांच्या खोकलाशिंकाद्वारे मयकोबॅक्टेरियम लेप्री जिवाणु हवेमध्ये पसरतात. श्वसनप्रक्रिया मध्ये निरोगी व्यक्तीच्या शरीरामध्ये मायकोबॅक्टेरियम लेप्री जिवाणु प्रविष्ठ होतात. दुषित हवेद्वारे कुष्ठरोगाचा प्रसार होतो. कुष्ठरोग बाधित व्यक्ती सोबत जवळचा संपर्क असल्यास त्याचा प्रसार होतो. कुष्ठरोगाविरुध्द लढण्याच्या नैसर्गिक रोगप्रतिकार शक्तीमुळे बहुतांश लोकांना (९८ टक्के) कुष्ठरोग होत नाही. कुष्ठरोग कोणालाही होऊ शकतो.

**अधिशयन काळ :** ६ महिने ते १० वर्षे. रोगनिदान :- बाहय शारीरिक तपासणी उदा. त्वचेवर लालसर फिकट न खाजणारा, न दुखणारा, बधीर चट्टा तपासणी, कानाच्या पाळया जाड, भुवयांचे केस विरळ, हाता पायाची बोटे वाकडी पाहणी, बायोप्सी.

**प्रकार** :- कुष्ठरोगाचे दोन प्रकार आहेत १) पी.बी.(पॉलीबॅसिलाय) व २) एम.बी.(मल्टीपल बॅसिलाय).

**औषधोपचार** :- सर्व शासकिय रुग्णालयात रोगनिदान व औषधोपचार मोफत उपलब्ध आहे. एम.डी.टी.औषधोपचार पध्दती आहे. पी.बी.केस मध्ये ०६ महिने औषधोपचार दिला जातो. यामध्ये टॅब.डापसोन, रिफामायसिन दिल्या जातात. पी.बी. केस असंसर्गजन्य आहे. एम.बी.केस मध्ये १२ महिने औषधी दिली जाते. यामध्ये टॅब.डापसोन, रिफामायसिन व क्लोफायझीमीन दिल्या जातात. एम.बी.केस संसर्गजन्य आहे. पी.बी.केस मध्ये १ ते ५ चट्टे व एम.बी.केसमध्ये असंख्य चट्टे असतात. कुष्ठरोगामुळे अंधत्व, किडनीविकार, स्नायु कमकवुत, कायमचे हाताचेपायाचे बोटे नष्ट होते, मज्जातंतुचे नुकसान होते, चेहरा विकृतीग्रस्त होतो.

**गैरसमज** :- कुष्ठरोग अनुवांशिक नाही. कुष्ठरोग हा शाप नसून जिवाणुमुळे होणार रोग आहे. सामाजिक घटक :- गरीबी, वैयक्तीक अस्वच्छता, गर्दी. प्रतिबंध :- बी.सी.जी. लस घेतल्यामुळे ५० टक्के कुष्ठरोगापासुन संरक्षण मिळते. आरोग्यदायक वातावरण ठेवणे, विटामीन अे,सी,डी,इ, बी-१२ व खनिज झिंक, मॅग्नेशियम व शिलेनियम चे प्रमाण व्यवस्थित ठेवणे. कुष्ठबाधित व्यक्तीचे लवकरात लवकर निदान करुन एम.डी.टी. औषधोपचाराखाली आणणे. एम.डी.टी.औषधोपचार प्रणालीमुळे कुष्ठरोग पुर्णपणे बरा होतो. आवाहन :- दिसता अंगावर चट्टा डॉक्टरला भेटा.

**-(डॉ.जयश्री भुसारे) जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जि.प.जालना.**

# उन्हाळ्यात खसखस खा, शरीर राहील ठंडा-ठंडा कूल-कूल

खसखस बियाणे एक थंड प्रभाव आहे. उन्हाळ्यात खसखस खाल्ल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात. खसखस हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. यामध्ये लोह, तांबे, फायबर आणि प्रथिने यांसारखे पोषक घटक असतात. खसखस खाल्ल्याने पोटाला थंडावा मिळतो. त्यामुळे ॲसिडिटी आणि बद्धकोष्ठतेच्या समस्येपासूनही आराम मिळतो.

याशिवाय हे खाल्ल्याने शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. खसखस हाडे मजबूत करतात. उन्हाळ्यात हे खाल्ल्याने शरीराला असंख्य फायदे मिळतात. खसखसचे आरोग्यदायी फायदे जाणून घेऊया.

**पोटासाठी चांगले**

खसखस थंड असते. हे खाल्ल्याने शरीर थंड राहते. या बिया शरीराला हायड्रेट ठेवण्याचे काम करतात. याच्या मदतीने तुम्ही पोटाशी संबंधित समस्या टाळू शकता. खसखसमुळे तुम्हाला खूप आराम वाटतो. यामुळे तुमच्या पोटालाही आराम मिळतो.

**ॲसिडिटी**

उन्हाळ्यात या बिया खाल्ल्याने ॲसिडिटीपासून आराम मिळतो. या बिया खाल्ल्याने पोटाची जळजळ तसेच छातीत जळजळ कमी होण्यास मदत होते. तुम्ही रोज सकाळी खसखस दुधात मिसळून घेऊ शकता. हे ॲसिडिटीची लक्षणे कमी करण्याचे काम करते.

**पचन**

या बिया खाल्ल्याने पचनक्रिया निरोगी राहण्यास मदत होते. खसखस बद्धकोष्ठता आणि गॅसच्या समस्येपासून आराम देते. या बियांमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. ते पचनाशी संबंधित इतर अनेक समस्या दूर करण्याचे काम करतात.

**तणाव**

खसखस तुमचा तणाव कमी करण्याचे काम करते. जर तुम्ही खूप तणावाखाली राहत असाल तर तुम्ही खसखस खाऊ शकता. खसखस खाल्ल्याने तुमचा मूड सुधारतो.

**रक्तदाब**

खसखसच्या बियांमध्ये ओलिक ॲसिड असते. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. खसखसमध्ये आहारातील फायबर असते. हे खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित करते. खसखस रक्ताभिसरण सुधारते. रक्तदाबाची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी तुम्ही खसखसही खाऊ शकता.



# टोमॅटो खाण्याचे हे फायदे ऐकलेत तर तुम्ही आजप–

जर तुम्हाला सलग ३० दिवस टोमॅटोचा रस प्या असे सांगितले तर तुम्ही प्याल का? असा प्रश्न आहे. पण तुम्हाला जर महिनाभर टोमॅटोचा रस प्यायल्याने होणारे कमालीचे बदल सांगितले तर मात्र तुम्ही आजपासूनच टोमॅटोचा रस प्यायला सुरूवात कराल. कारण आपल्या स्वयंपाकघरात रोज दिसणारा टोमॅटो, केवळ भाजीतला रंग बदलत नाही तर आरोग्याचा रंगही बदलू शकतो.

टोमॅटो हा एक नैसर्गिक औषधाचा खजिना आहे. त्यामुळे टॉमेटोचा रस रोज प्यालात तर तुम्हाला रोजच्या जीवनात अनेक महत्त्वाचे फायदे होऊ शकतात. टोमॅटोमुळे होणारा पहिला आणि महत्त्वाचा फायदा म्हणजे टोमॅटोमध्ये असलेले घटक ङ्बॅड कोलेस्ट्रॉलफ कमी करून ङ्गुड कोलेस्ट्रॉलफ वाढवतात. त्यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारून हार्ट अटॅकचे प्रमाण कमी होते. दुसरं म्हणजे दररोज टोमॅटोचा रस प्यायल्याने किडनी आणि मूत्रसंस्था स्वच्छ राहते. यामुळे युरिनच्या समस्यांना पुर्णविराम मिळतो. तसेच शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडतात.

चेहऱ्याची त्वचा नितळ ठेवण्यासाठी फॉलो करा या टिप्स! आपल्या शरीरात जेव्हा एखादा बदल होतो, तेव्हा त्याचा परिणाम लगेच आपल्या चेहऱ्यावर दिसतो. जसे की, आपण अतिउष्ण पदार्थ खाल्ले तर चेहऱ्यावर पुरळ ...तिसरं म्हणजे टोमॅटोमध्ये मुबलक ङ्व्हिटॅमिन केफ असतं. त्यामुळे हाडे मजबूत होतात. टॉमेटोच्या रसामुळे वजन नियंत्रणात राहतं. त्यामुळे तुम्हाला जर वजन कमी करायचे असेल तर महिनाभर टॉमेटोचा रस प्या. जे लोक फिटनेसकडे लक्ष देतात, त्यांच्यासाठी तर टोमॅटोचा रस नैसर्गिक डिटॉक्स ड्रिंक आहे. शरीराप्रमाणेच त्वचेलाही टोमॅटोचा फायदा होतो. टोमॅटोतील लाइकोपीन हे अँटिऑक्सिडंट त्वचेवरील डाग कमी करतात आणि सूर्यकिरणांपासून त्वचेचं संरक्षण करतात. त्यामुळे टोमॅटोमुळे चेहऱ्यावरचा ग्लो वाढतो! आता तुम्हाला टोमॅटोचा रस कसा करावा असा प्रश्न पडला असेल?

टोमॅटोचा रस करण्यासाठी टोमॅटो स्वच्छ धुवा, कापा आणि मिक्सरमध्ये वाटा. त्यात थोडं मीठ, काळी मिरी, आलं आणि लिंबाचा रस मिसळा. अशाप्रकारे तुम्ही रोज टोमॅटोचा रस प्यायलात तर नक्कीच शरीराला महत्त्वाचे फायदे होतील.



# परिश्रमाशिवाय कीर्ती नाही



लहानशा गोष्टी, मोठा अर्थ : शिल्पा अष्टमकर

मनुष्याला जीवनात यश, मान-सन्मान आणि कीर्ती हवी असते. पण ही कीर्ती केवळ इच्छा करून किंवा स्वप्न पाहून मिळत नाही. यशाची पहिली पायरी मेहनत आणि दुसरी पायरी सातत्य हीच असते. जीवनात मोठेपण मिळवायचे असेल, तर कठोर परिश्रम, त्याग आणि चिकाटी हा पर्याय टाळता येत नाही. कीर्ती पाहो जाता सुख नाही। सुख पाहता कीर्ती नाही। विचारेवीण कोठेचि नाही। समाधान।। - दासबोध


'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' असेही समर्थांनी सांगितले आहे. मात्र फुकटची कीर्ती कठीण आहे. दु:ख सहन केल्याशिवाय, अविश्रांत परिश्रम केल्याशिवाय कीर्ती प्राप्त होत नाही. कीर्ती हे जीवनसत्त्व आहे. काही जण कीर्तीसाठी उलट अरिष्ट परिस्थिती निर्माण करतात. परिश्रम केल्याशिवाय कीर्ती प्राप्त नाही होऊ शकत. लोकमान्य टिळकांना एकाने विचारले - मी काय केले म्हणजे लोक मलादेखील लोकमान्य म्हणतील? त्यावर टिळकांनी त्वरित उत्तर दिले - मला लोकांनी लोकमान्य म्हणावे ही अपेक्षा सोडून दे. कीर्ती हे उद्दिष्ट नसावे, तो आपल्या कठोर श्रमांचा, त्यांगाचा परिणाम असावा. थोर पुरुषांची कीर्ती ही सुगंधाप्रमाणे सर्वत्र पसरते. टिळकांनी आपला देह चंदनासारखा झिजवला. शाळेत शिक्षकांची नोकरी करत असताना त्यांनी कधी पगार घेतला नाही. दोन वेळा तुरुंगवास सोसला. मंडालेच्या तुरुंगात तर त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला.

जरा सावरकारांचे चरित्र वाचा. त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी उगीच मिळाली नाही. त्यांना दोन जन्मठेपेच्या शिक्षा झाल्या. अंदमान येथील काळ्या पाण्यात त्यांना जे जेवण मिळे त्याने त्यांचे पोट बिघडले. घाण्याच्या बैलाला जुंपावा तसे कोलू ओढून तेल काढण्यासाठी त्यांना जुंपले गेले. त्यांना रक्ती आव पडण्याचा त्रास सुरू झाला. तेव्हा डॉक्टरानी रोज दूध घेत जा म्हणून सांगितले. पण तुरुंगातील बारीने त्यांना दूध देण्याचे नाकारले. सावरकरांनी या विरोधी वातावरणात कमला नावाचे महाकाव्य लिहिले. तुरुंगातील कैद्यांसाठी साक्षरतेचे वर्ग सुरू केले. रत्नागिरी येथील तुरुंगात त्यांनी अस्पृश्यता निवारणाची मोहीम हाती घेतली. पतितपावन मंदिर हरिजनांसाठी खुले केले.' माझी जन्मठेप' हे सावरकरांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. पण त्यात त्यांनी कुठेही इंग्रज सरकार किंवा बारी यांच्याबद्दल एकही अक्षर वाईट लिहिले नाही. कीर्ती हवी असेल तर आपल्याला आपली सहनशक्ती, प्रेम, कळकळ वाढवावी लागते. परिश्रम करणारा माणूसच उंच भरारी मारतो. झाडावर बसलेला पक्षी कधी उडायचं हे ठरवतो, पण उडण्यासाठी त्याला पंख हलवावेच लागतात. त्याप्रमाणे यश हवे असेल, कीर्ती हवी असेल, तर मनातील क्षमतांना, बुद्धीला आणि आत्मविश्वासाला सतत परिश्रमांची जोड देणे आवश्यक आहे. परिश्रमाशिवाय मिळालेली कीर्ती टिकत नाही; पण परिश्रमातून मिळालेली कीर्ती चिरंतन असते.

# हवेचे रेणू

कथा : प्रा. देवबा पाटील

सीता व नीता ह्या दोन्ही बहिणींना वाचनाची अतिशय आवड होती. त्यांचे आई-बाबा दरमहा त्यांच्याकरिता प्रत्येकीसाठी वेगवेगळे असे एखादे संस्कारक्षम गोष्टींचे किंवा एखादे बोधप्रद कवितांचे पुस्तक हमखास विकत आणायचेच. एका वेळी एकीला बालकथांचे पुस्तक आणले, तर दुसरीला बालकवितांचे पुस्तक आणायचे. दुसऱ्या महिन्यात पहिलीला बालकवितांचे पुस्तक द्यायचे तर दुसरीला छोट्यांच्या गोष्टींचे पुस्तक द्यायचे. आपापले पुस्तक वाचून झाले म्हणजे त्या दोघी ती पुस्तके आपापसात बदलून घेत असत व ते दुसरे पुस्तक वाचत असत. म्हणजे त्यांना प्रत्येकीला दरमहा दोन-दोन पुस्तके वाचायला मिळत असत. प्रत्येक पुस्तक वाचून झाल्यानंतर त्या फावल्या वेळी त्या पुस्तकावर चर्चाही करीत असत. त्यामुळे त्यांची अभ्यासासोबत वाचनाची आवडही जोपासली जात होती. सुवाचनामुळे त्यांच्या विचारांना चालना मिळून त्यांची आकलनशक्ती वाढत होती. त्यामुळे त्यांच्या स्मरणशक्तीचासुद्धा विकास होत होता. त्यांच्यातील जिज्ञासूवृत्ती जागृत होऊन बुद्धी वृद्धिंगत होत होती. वैचारिक शक्ती विकसित होत होती. त्यांचे घरी त्यांची प्राध्यापिका मावशी आलेली होती. ह्या त्या मावशीला दररोज शाळा सुटल्यावर विविध प्रश्न विचारीत असत. आजही त्यांची चर्चा सुरू झाली. तुम्हाला रेणू म्हणजे काय हे तर आता माहीतच आहे. मावशीने विचारले. हो मावशी, काणत्याही पदार्थाचा छोटासा कण म्हणजे रेणू. नीताने उत्तर दिले. बरोबर आहे. मावशी सांगू लागली, थोडे विस्ताराने म्हणायचे तर पदार्थाचा लहानात लहान, स्वतंत्रपणे सुटा राहू शकणारा व ज्याची रचना आणि गुणधर्म हे अगदी जसेच्या तसे त्या पदार्थासारखेच आहेत अशा कणास रेणू म्हणतात. ज्या पदार्थाचे रेणू हे एका विशिष्ट अवस्थेत व ठरावीक रचनेत एकमेकांच्या अगदी पक्के जवळ असतात, ज्यांमध्ये किंचितसेही अंतर नसते म्हणजे ते एकमेकांना इतक घट्ट चिकटून असतात, त्यांमधून प्रकाश मुळीच जाऊ शकत नाही म्हणून ते अपारदर्शक असतात. पण ज्या पदार्थांचे रेणू एकमेकांपासून किंचितसेही अलग अलग असतात, ज्यांमध्ये सूक्ष्मसे अंतर असते त्यांमधून प्रकाश किरणांना



जायला सूक्ष्मशी जागा मिळते व प्रकाश त्यांमधून आरपार जातो. त्याला पारदर्शक पदार्थ असे म्हणतात. हवेला रंग, रूप आणि आकार नसल्यामुळे ती जरी आपणास दिसत नाही तरीही हवेला रेणू असतात. हवेचे रेणू हे एकमेकांपासून वेगवेगळे व सुटे असतात. त्यांच्यामध्ये असलेल्या अंतरामुळे ते हवेत सतत इतस्तत: फिरत असतात. त्यामुळे सूर्यप्रकाश त्यांच्यातून आरपार जातो. म्हणूनच हवा आपणास दिसत नाही. पण हवेत हे रेणू कोठून येतात मावशी? सीताने प्रश्न केला. पदार्थासारखेच हवेलासुद्धा रेणू असतात. कारण हवेत अनेक घटक असतात. तुम्हाला माहीत आहेत का हवेचे घटक? मावशीने विचारले. हो मावशी, हवेत प्राणवायू असतो. सीताने सांगितले व पुढे म्हणाली, त्याच्यामुळेच आपण जगू शकतो. म्हणूनच त्याला प्राणवायू म्हणतात ना मावशी? हो. प्राणवायूशिवाय आपण जगूच शकत नाही. तो नसला तर आपला प्राण म्हणजे जीव कासावीस होतो. म्हणूनच त्याला प्राणवायू म्हणतात. मावशी म्हणाली. आणि हवेत धूळही असते ना मावशी? ही धूळ आपल्या जमिनीवरून आकाशात वर उडत जाते काय मावशी? नीताने बाळबोधपणे विचारले. मावशी सांगू लागली, धूळीबद्दल सांगायचे झाल्यास आपल्या पृथ्वीभोवतीच्या वातावरणात खूप धूळ असते. वादळवाऱ्यासोबत पृथ्वीवरील धूळ तर वर आकाशात जातेच पण ज्वालामुखींच्या स्फोटांतून राख आकाशात खूप उंच वर उडते. आकाशातून नेहमी पडणाऱ्या व जळून खाक होणाऱ्या लाखो उल्कांची राख वातावरणात असते. ही राख म्हणजे एकप्रकारची धूळच असते. पृथ्वीवरील असंख्य गिरण्यांचा, कारखान्यांचा व घरोघरच्या जळणातून उत्पन्न होणारा धूर वरतीच जातो. अशा तऱ्हेने वातावरणात धुळीचे सूक्ष्म कण इतस्तत: सतत फिरत असतात. या धूलिकणांवरूनच सूर्यप्रकाशाचे परावर्तन होऊन तो चोहीकडे उधळला जातो, पसरतो त्यालाच प्रकाशाचे विकिरण किंवा विखुरणे म्हणतात. इतक्यात त्यांचे बाबा घरी आले. त्यामुळे त्यांची त्या दिवशीची

# चमक

प्रतिभारंग : प्रा. प्रतिभा सराफ

दिवाळीमध्ये घरी भेटायला आलेल्या एका जवळच्या कुटुंबीयांनी अतिशय सुंदर रंगीत वेष्टनात एक चौकोनी डबा मुलीच्या हातात दिला. चहा, फराळ झाल्यावर गप्पागोष्टी करून ते गेले. साहजिकच ते गेल्यावर मुलीने रंगीत वेष्टन बाजूला करून डबा उघडला. मी तिच्या हालचाली निरखत होते. ज्या तऱ्हेने तिने रंगीत वेष्टन फाडले आणि हाताने चुरगळून टीपॉयवर ठेवले, ते पाहून वाईट वाटले. आता त्या डब्यात काय होते हे फार महत्त्वाचे नाही तर महत्त्वाचे हे आहे की हेच वेष्टन मी उघडले असते (इथे मी 'उघडले' हा शब्द वापरला आहे 'फाडले' हा वापरलेला नाही.) तर हलक्या हाताने चिकटपट्टी काढून संपूर्ण कागद हाताने सपाट करून त्याला घडी घालून घरात कुठेतरी ठेवला असता! आता तुम्ही असेही विचारू शकता की असेच जमा केलेले कागद तुम्ही दुसऱ्या माणसांच्या गिफ्ट पॅकसाठी वापरता का? तर तसे अजिबात नाही कारण प्रत्येक वेळेस आपल्याकडे असलेले कागद दुसऱ्या भेटवस्तू बांधण्यासाठी वापरण्यायोग्य राहतातच असे नाही. पण इतका सुंदर रंगीत चकचकीत कागद असा सरळ चुरगळून त्याला कचऱ्याची बादली दाखवणे मला तरी शक्य होत नाही. ग तुम्ही कचरा जमा करून ठेवता का, असाही प्रश्न तुमच्या मनात येऊ शकतो. तर असे अजिबात नाही; परंतु त्याचा एकदा तरी उपयोग मी करतेच! त्याच्या झिरमिऱ्या किंवा पताका बनवून सणासुदीच्या वेळेस घराच्या ग्रीलला लावण्यासाठी त्याचा उपयोग करता येतो. मुलांच्या वहीत चिकटवण्याच्या प्रोजेक्टमधील 'कोलाज' किंवा सायन्स प्रोजेक्ट इत्यादीसाठी हे रंगीत चकचकीत कागद खूप उपयोगी पडतात.भेटवस्तू गुंडाळण्यासाठी वापरलेल्या सजावटीच्या कागदाशी निगडित माझ्या बऱ्याच जुन्या आठवणी आहेत.

आमच्या लहानपणी अलीकडे मिळतो तसा पातळ फारसा न चुरगळणारा आणि इतका चकचकीत कागद मिळत नव्हता. तो कागद तर पटकन फाटणारा आणि अतिशय चुरगळणारा असा असायचा. त्याच्यावरच्या चिकटपट्ट्या काढतानाच तो कागद फाटायचा. तरी त्यातला अधलामधला वापरण्यायोग्य भाग काढून आम्ही साठवून ठेवायचो. आई-बाबांच्या, आजी-आजोबांच्या, बहीण-भावांच्या तसेच मित्र-मैत्रिणींच्या वाढदिवसाला याच पेपरमध्ये आम्ही त्यांना भेटवस्तू बांधून द्यायचो. नवीन कागद आणणे ही गोष्ट सहजशक्य नसायची. तो विकत घेण्यासाठी आई-वडिलांकडे पैसे मागावे लागायचे किंवा घरात कागद आहे तर परत पैसे खर्च कशाला करायचे, असाही विचार त्या काळात मनामध्ये असायचा. जुने कागद अशा तऱ्हेने पुन्हा वापरताना अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळायच्या. आता अलीकडे आपण ज्या दुकानातून भेटवस्तू घेतो तिथेच आपल्याला अतिशय सुंदर प्रकारे चकचकीत कागद गुंडाळून रिबीन, बो वगैरे लावून, देणाऱ्या-घेणाऱ्याचे नाव लिहिता येईल असे कार्ड लावूनच हातात दिले जातात किंवा जे दुकानदार रॅपिंग पेपर विकतात तेच आपल्या भेटवस्तू व्यवस्थित गुंडाळून आपल्या हातात देतात.

त्यामुळे अलीकडच्या मुलांना मी गिफ्ट पॅक करताना पाहिलेले नाही. रॅपिंग पेपर हा उत्कृष्ट रंगांनी सजवलेला, लॅमिनेटेड असतो. शिवाय त्यात सोनेरी आणि चांदीच्या रंगाचे आकार, ग्लिटर, प्लास्टिक अशाही काही वेगवेगळ्या गोष्टी वापरलेल्या असू शकतात. तो पेपर आकर्षक बनवण्यासाठी घेतलेला खर्च हा ग्राहकाकडूनच शेवटी वसूल केला जातो. म्हणजे म्हणतात ना 'मीया मूठभर दाढी हातभर!' त्याप्रमाणेच अलीकडे पन्नास रुपयाच्या वस्तूसाठी रॅपिंग पेपर आणि ते बांधण्यासाठी दिलेले पैसे कदाचित पन्नास रुपयांपेक्षा जास्त असू शकतात.

## डॉक्टर टीप्स

### पुरुषांनी चुकून खाऊ नये हे ५ पदार्थ, शारीरिक कमतरता जाणवू शकते



बदलत असलेली जीवनशैलीचा प्रभाव दांपत्य जीवनावर पडत आहे. हल्ली ताणावाच प्रभाव मॅरिड लाईफवर पडत असून अनेक दंपती बाळाला जन्म घालण्यास समर्थ ठरतं आहे. खानपान, राहणी आणि धावपळीच्या या काळात पुरुषांमध्ये नपुंसकत्व वाढत आहे. योग्य आहार आणि पोषणाची कमी या कारणामुळे पुरुषांची प्रजनन क्षमता प्रभावित होत आहे. अशात कमजोरीमुळे दांपत्य जीवनातील आनंद देखील हरवत आहे. तर आज जाणून घ्या नपुंसकत्वासाठी जवाबदार ५ **खाद्य पदार्थांबद्दल:**



**२ जंक फूड**-जंक फूड शौक आणि हल्लीची गरज होऊन गेली आहे. पण आपल्या हे माहीत असावं की ज्या वस्तूमध्ये फॅट आणि शुगर अधिक प्रमाणात असतं ते पदार्थ पचन तंत्र, हृदय आणि प्रजनन सेल्ससाठी उपयुक्त नाही. या प्रकारा आहार आपल्या स्पर्म काउंटच्या विकासावर विपरीत प्रभाव टाकत असतो **(क्रमश: )**

## विनोद




'मला असा माणूस माहीत आहे की, ज्याच्या लग्नाला तीस वर्षे झाली आणि तो आपली प्रत्येक संध्याकाळ घरातच बायकोच्या सहवासात घालवतो.'

'वा ! याला म्हणतात प्रेम.'

'पण डॉक्टर म्हणतात पॅरॅलेसिस....'

## संदेश

Salman Khan Dialogues
"Veer
Jahan bhi Msg krunga 5-10 msg
ek sath bhej dunga
"Wanted"
Ek baar jo mene "sms" KRNA
shuru kr diya to
uske baad to me apne "Balance"
ki bhi nhi sochta..

## सुविचार




ज्याची कसलीही मागणी नसते तो सम्राट असतो.
**- महर्षि कणाद**

**संस्कृत सुभाषित**

अनिशश्चावमानी च स शीघ्रंभ्रश्यते श्रिय:।।
(सौप्तिकपर्व, अध्याय २, १क २५, महाभारत)

**अर्थ** – हातात सत्ता नसतानाही जो दुसऱ्याचा उपमर्द करतो तो ऐश्वर्यापासून लवकरच भ्रष्ट होतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. दुसऱ्यावर अवलंबवून असणे
६. महिरप
९. हिंदीतील सत्य
१०. धाक, वचक
११. रामदासस्वामींचा हा ग्रंथ आधुनिक व्यवस्थापकांनाही उपयोगी
१३. बोहारणीप्रमाणेच याची हाकही लुप्त झालेली दिसते
१६. मुलायम, मऊ
१८. अखंड पडणारी (धार)
१९. बढाई, फुशारकी
२०. नंतर
२१. पैसे देण्यास असमर्थ
२३. बंदुकीच्या फैरी
२५. नातेवाईक
२८. मलई
२९. लहान
३१. फरक, तफावत
३३. अभिनेता (हिंदी)
३५. दरवाजाची झाप
३७. शिकार
३८. गणपती
४०. मोठी नदी
४२. पोळी भाजण्याचे पात्र
४३. अजगर, विट्टीदांडूतील सहा
४४. शोध, माग
४६. वर्षानुवर्षे
४९. रवाळ
५१. अति उंचीचे वर्णन करणारे दोन वृक्ष
५२. शपथ
५३. पैशाचे सन्मानपूर्वक घेतले जाणारे नाव
५५. शहर, गाव
५७. मध
५९. चौकोनी पायऱ्यांनी विहीर
६०. विश्व, दुनिया
६१. चंद्र
६२. हिरवा (हिंदी)
६४. स्थानक
६५. जंगली
६७. हाताचा एक भाग
६९. सांगणे
७०. वन, रान
७१. राजबिंडा
७३. अर्धा 'र'
७५. जळलेला
७७. धनी
७९. अपेक्षाभंग होणे, गंडणे
८१. रचना करणारा
८२. अखेर, उदरभरणाची अखेर
८३. उत्तरेकडील शिवस्थान, विश्वेश्वराची नगरी

## उभे शब्द

१. ट्रेकिंगला मराठी शब्द
२. थोडक्यात राजमान्य राजेश्री
३. मिरवणूक,४. पत्त्यातील सुकामेवा
५. धमनी,६. पुष्परस
७. रड्या मनुष्य
८. कोल्हापूरची देवी
९. शेराला हा कधी तरी भेटतोच
१२. डोंगर पोखरून काढलेला रस्ता
१४. थाप, गप
१५. सततची बडबड (ला.)
१७. निकट, जवळ
२१. नगरासंबंधी
२२. यापेक्षा फळाच्या फोडी खाणे चांगले
२३. आवड, रस
२४. पोते, गोणपाट
२५. नेता, आदर्श
२६. लुच्चा, धूर्त
२७. राजसभा
३०. जेमतेम
३१. काजळ-सुरमा इ.प्रकार
३२. अंगातील मस्ती
३३. पायात चप्पल न घालता
३४. सहाय्य,३६. वाचा, बोलणे
३९. बुद्धाच्या जन्मकथा
४१. कणव, कीव
४३. नौदल
४५. पं.रविशंकर यांचे वाद्य
४६. लहानमोठ्या वस्तू
४७. तक्क्याच्या जोडीचे टेकण
४८. पटकन
५०. गयावाया करणे
५४. शरणागताला दिलेले अभय
५५. दृष्टीभेट
५६. आकाश, नभ
५७. कबरीवरील वास्तु
५८. जाळणे
६३. क्रोध
६६. समीक्षक
६७. चर्चा, खलबत
६८. शेंगेवरील साल
७२. शिल्लक
७४. मान अडकवणारा
७६. संभाव्य संकट, जोखीम
७८. काठ, बाजू
८०. काचेची छोटीशी बाटली

## आडवे उत्तर

१.परावलंबन ६.मखर ९.सच १०.दरारा ११.दासबोध १३.डबाबाटलीवाला १६.तलम १८.संतत १९.शेखी २०.मग २१.नादार २३.गोळीबार २५.नातलग २८.साय २९.बारीक ३१.अंतर ३३.अदाकार ३५.कवाड ३७.सावज ३८.गजानन ४०.नद ४२.तवा ४३.आर ४४.तपास ४६.सालोसाल ४९.कणीदार ५१.ताडमाड ५२.भाक ५३.दामाजी ५५.नगर ५७.मकरंद ५९.बारव ६०.जग ६१.सुधाकर ६२.हरा ६४.थांबा ६५.रानटी ६७.मनगट ६९.कथन ७०.कानन ७१.राजस ७३.रफार ७५.जळका ७७.मालक ७९.फसणे ८१.रचनाकर ८२.तड ८३.काशी

## उभे उत्तर

१.पदभ्रमण २.रास ३.वरात ४.बदाम ५.नस ६.मध ७.रडतराऊत ८.अंबा ९.सवाशेर १२.बोगदा १४.बात १५.टकळी १७.लगत २१.नागरी २२.रस २३.गोडी २४.बारदान २५.नायक २६.लबाड २७.दरबार ३०.कसाबसा ३१.अंजन ३२.रग ३३.अनवाणी ३४.मदत ३६.वाणी ३९.जातककथा ४१.दया ४३.आरमार ४५.सतार ४६.सामानसुमान ४७.लोड ४८.लवकर ५०.दादा बाबा करणे ५४.जीवदान ५५.नजरानजर ५६.गगन ५७.मकबरा ५८.दहन ६३.राग ६६.टीकाकार ६७.मसलत ६८.टरफल ७२.जमा ७४.फास ७६.धोका ७८.कड ८०.शिशी



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### बांगलादेशच्या महिला कर्णधाराचे सिलेक्टरवर लैंगिक अत्याचाराचे आरोप

मुंबई–बांगलादेशच्या महिला क्रिकेट संघातील वेगवान गोलंदाज जहानारा आलम हिने माजी क्रिकेटपटू आणि निवड समितीचे माजी सदस्य मंजुरुल इस्लाम यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. सध्या मानसिक आरोग्याच्या कारणास्तव संघाबाहेर असलेली जहा–नारा हिने खुलासा केला की, २०२२ महिला वनडे विश्वचषकादरम्यान राष्ट्रीय संघ व्यवस्थापनातील काही लोकांकडून तिला अशोभनीय प्रस्ताव देण्यात आले होते. तिने सांगितले की, हे प्रस्ताव नाकारल्यानंतर मंजुरुल इस्लाम यांनी तिच्या कारकिर्दीत अडथळे आणण्यास सुरुव–ात केली. यापूर्वीही जहानाराने बांगलादेश महिला संघाच्या कर्णधार निगार सुलताना हिच्यावर मारहाणीचे आरोप केले होते.बांगलादेशी पत्रकार रियासत अजीम यांच्या यूट्यूब चॅनेलवरील मुलाखतीत जहानारा म्हणाली, मला एकदा नाही तर अनेक वेळा अशोभनीय प्रस्ताव दिले गेले. जेव्हा आपण संघाशी जोडलेले असतो, तेव्हा अनेक गोष्टी सांगणे अवघड होते. कारण आपली रोजीरोटी त्यावरच अवलंबून असते.

***

### एक मोठा निर्णय अन् प्रतिका रावलच्या डोळ्यात पाणी, नेमके काय घडले?

मुंबई –आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ जिंकून टीम इंडिया पहिल्यांदाच विश्वविजेती ठरली. मात्र या ऐतिहासिक विजयाच्या प्रवासात सलामी फलंदाज प्रतिका रावल हिचे नशीब साथ देऊ शकले नाही. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात तिच्या पायाला दुखापत झाल्याने ती स्पर्धेतून बाहेर पडली. तिच्या जागी शेफाली वर्मा संघात आली आणि तिनेच सेमीफायनल व फायनल सामने खेळले. परंतु जेव्हा विजेत्या खेळाडूंना पदके देण्यात आली, तेव्हा प्रतिका देखील पदक परिधान करताना दिसली. त्यामुळे चाहत्यांमध्ये प्रश्न निर्माण झाला.

**प्रतिका रावल काय म्हणाली?**

यावर अखेर प्रतिका रावलनेच मौन तोडत जय शाह यांचं नाव पुढे केलं. एका वृत्तवाहिनीशी बोलताना ती म्हणाली, मफ्जय शाह सरांनी आमच्या टीम मॅनेजरला मेसेज करून सांगितलं की, माझं मेडल ते स्वत: अरेंज करतील. त्यामुळे मला माझं स्वत:चं मेडल मिळालं. जेव्हा मी ते उघडलं आणि त्याच्याकडे पाहिलं, तेव्हा माझ्या डोळ्यात पाणी आलं. मी फार भावनिक होत नाही, पण तो क्षण खरोखर खास होता.

***

### आशिया कपनंतर पुन्हा एकदा भारत विरुद्ध पाकिस्तान! आज सामना

मुंबई ७ नोव्हेंबर (पीएसआय)

क्रिकेट जगतात भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना म्हणजे नेहमीच रोमांच, तणाव आणि उत्सुकतेचा शिखरबिंदू. आणि आज पुन्हा एकदा दोन्ही संघ एकमेकांसम ोर उभे ठाकणार आहेत, तेही लोकप्रिय आणि धडाकेबाज हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत. ही स्पर्धा लहान स्वरूपाची असली तरी चौकार–षटकारांचा पाऊस, झटपट विकेट्स आणि तुफानी फील्डिंग यामुळे प्रेक्षकांना थरारक अनुभव मिळतो. आजचा भारत–पाक सामना दुपारी १:०५ वाजता (घएऊ) सुरू होणार असून जगभरातील क्रिकेट चाहत्यांचे लक्ष या लढतीवर असेल.

स्पर्धेचे स्वरूप आणि महत्त्व

हाँगकाँग सिक्सेस २०२५ मध्ये एकूण १२ संघ सहभागी आहेत. या संघांना चार–चार टीमच्या तीन गटांमध्ये विभागले आहे. प्रत्येक गटातील फक्त दोन सर्वोत्तम संघ एलिमिनेशन राऊंडमध्ये प्रवेश मिळवतील.

# पावसाच्या व्यत्यय खेळातही भारताचा दणदणीत विजय!

## पाकिस्तानला अवघ्या २ धावांनी लोळवले



मोंग कोक : भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ जेव्हा जेव्हा आमनेसामने येतात, त्यावेळी क्रिकेट चाहत्यांना रोमांचक सामना पाहायला मिळतो. काही दिवसांपूर्वी आशिया चषक २०२५ स्पर्धेचा थरार रंगला. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ ३ वेळा आमनेसामने आले होते. या तिन्ही सामन्यांमध्ये भारताने पाकिस्तानचा एकतर्फी पराभव केला.

दरम्यान हाँगकाँग सिक्सेज क्रिकेट स्पर्धेत 'क' गटातील एका महत्त्वपूर्ण भारत सुपर सिक्सेस लीग स्पर्धेत क्रिकेट चाहत्यांना पुन्हा एकदा भारत–पाक हाय–व्होल्टेज सामना पाहायला मिळाला. आशिया चषक २०२५ मधील वर्चस्वानंतर, या स्पर्धेतही भारतीय संघाने पाकिस्तानचा डकवर्थ लुईसने नियमानुसार २ धावांनी धुव्वा उडवत आपला दबदबा कायम ठेवला.भारतीय संघ यंदा कर्णधार दिनेश कार्तिकच्या नेतृत्वाखाली खेळला असून पाकिस्तान संघाची धुरा यंदा कर्णधार अब्बास अफरीदीच्या खांद्यावर होती. तसेच हा सामना पूर्ण षटकांचा खेळला जाऊ शकला नाही आणि अखेरीस डकवर्थ–लुईस नियमाच्या आधारावर भारताला विजयी घोषित करण्यात आले. या अटीतटीच्या सामन्यात भारताने पाकिस्तानला २ धावांनी पराभूत केले. भारताचा सलामीचा फलंदाज रॉबिन उथप्पा याला त्याच्या आक्रमक खेळीसाठी 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरवण्यात आले.या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ६ षटकांमध्ये ४ गडी गमावून ८६ धावा फटकावल्या आणि पाकिस्तानसमोर विजयासाठी ८७ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात, पाकिस्तानच्या संघाने दुसऱ्या डावात ३ षटकांमध्ये १ गडी गमावून ४१ धावा केल्या होत्या, पण त्याच वेळी मुसळधार पावसाला सुरुवात झाली आणि त्यानंतर पुढील खेळ होऊ शकला नाही. अखेरीस, डकवर्थ–लुईस नियमानुसार भारताला विजयी घोषित करण्यात आले.

पाकिस्तानविरुद्धच्या या डावाची सुरुव–ात करण्यासाठी रॉबिन उथप्पा आणि भरत चिपली मैदानात उतरले. या दोन्ही सलामीच्या फलंदाजांमध्ये पहिल्या गड्यासाठी ४२ धावांची भागीदारी झाली आणि त्यानंतर उथप्पा बाद झाला.

उथप्पाने अवघ्या ११ चेंडूंमध्ये ३ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने २८ धावांची जलद खेळी साकारली. या दरम्यान त्याचा स्ट्राइक रेट २५४.५५ होता. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेला स्टुअर्ट बिन्नी फारशी चमक दाखवू शकला नाही आणि तो २ चेंडूंमध्ये एका चौकाराच्या सहाय्याने ४ धावा करून तंबूत परतला. चौथ्या क्रमांकावर कर्णधार दिनेश कार्तिक स्वतः फलंदाजीसाठी उतरला. त्याने ६ चेंडूंमध्ये एक षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने नाबाद १७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट २८३.३३ होता. भारतासाठी भरत चिपलीने १३ चेंडूंमध्ये २ षटकार आणि २ चौकारांसह २४ धावांचे योगदान दिले, तर अभिमन्यू मिथुनने ५ चेंडूंमध्ये एका चौकाराच्या मदतीने ६ धावा केल्या आणि तो धावबाद झाला. पाकिस्तानकडून गोलंदाजी करताना मोहम्मद शहजादने सर्वाधिक २ बळी घेतले, तर अब्दुल समदला एक यश मिळाले.

ावसामुळे थांबलेल्या दुसऱ्या डावात पाकिस्तानने ३ षटकांमध्ये १ गडी गमावून ४१ धावा केल्या होत्या.पाकिस्तानसाठी ख्वाजा नफे आणि माज सदाकत यांनी डावाची सुरुवात केली होती. माजने ३ चेंडूंमध्ये ७ धावा केल्या आणि तो स्टुअर्ट बिन्नीचा बळी ठरला, तर ख्वाजा नफे ९ चेंडूंमध्ये २ षटकार आणि एका चौकारासह १८ धावा काढून नाबाद राहिला. अब्दुल समदने ६ चेंडूंमध्ये एक षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने १६ धावा काढल्या आणि तो देखील नाबाद राहिला.


## जेमिमा, स्मृती आणि राधा यादव यांना प्रत्येकी २.२५ कोटी!




मुंबई : भारतीय महिला क्रिकेट संघाने आयसीसी महिला विश्वचषक २०२५ जिंकून देशासाठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिका संघाचा ५२ धावांनी दणदणीत पराभव करत प्रथमच हे जेतेपद पटकावले. या ऐतिहासिक विजयानंतर संपूर्ण देशात खेळाडूंचा सन्मान करण्यात येत आहे. दरम्यान, महाराष्ट्र सरकारने विश्वचषक विजेत्या संघातील राज्यातील खेळाडूंना विशेष सन्मानित करण्याची महत्त्वाची घोषणा केली होती, ज्याची पूर्तता आता करण्यात आली आहे. भारतीय महिला संघात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन प्रमुख खेळाडूंना राज्य सरकारने रोख रक्कम देऊन गौरवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, स्टार फलंदाज स्मृती मानधना, अष्टपैलू खेळाडू जेमिमा रॉड्रिग्ज आणि उत्कृष्ट फिरकीपटू राधा यादव यांना प्रत्येकी २.२५ कोटी रुपये इतके बक्षीस देण्यात आले आहे. या तिन्ही खेळाडूंनी विश्वचषक विजयात मोलाची कामगिरी बजावली होती. महाराष्ट्र सरकारने त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन दिलेला हा सन्मान राज्यातील इतर खेळाडूंसाठीही मोठा प्रेरणास्रोत ठरणार आहे.



इटलीतील मिलान येथे युईएफए चॅम्पियन्स लीग फुटबॉल साम न्यादरम्यान इंटर मिलान आणि कझाकस्तानचे खेळाडू.



अमेरिकेतील सॅक्रामेंटो येथे नियमित हंगामाच्या सामन्यादरम्यान सॅक्रामेंटो किंग्ज आणि गोल्डन स्टेट वॉरियर्सचे खेळाडू.

# विश्वविजेत्या संघाचा विजय देशातील मुलींसाठी प्रेरणादायी – मुख्यमंत्री



मुंबई : भारताला विश्वचषक जिंकून देणाऱ्या महिला क्रिकेट संघाचा विजय क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव यांना प्रत्येकी २ कोटी २५ लाख, तर प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना २२ लाख ५० हजार आणि सर्व सहकारी यांना प्रत्येकी ११ लाख रुपये व सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

आयसीसी महिला विश्वचषक २०२५ मध्ये प्रथमच भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांचा वर्षा या शासकीय निव–ासस्थानी सत्कार केला. गोलंदाजी प्रशिक्षक आविष्कार साळवी, पद्मश्री डायना एडल्जी, नालिस्ट अनिरुद्ध देशपांडे, लॉजिस्टिक सप–ोर्ट अपर्णा गंभीरराव, ऑपरेशन मॅनेजर मारुफ फजानदार, मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे, ममता शिरसुल्ला यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. माणिकराव कोकाटे, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, प्रधान सचिव संजय खंदारे, आयुक्त शितल तेली, उपसचिव सुनील पांढरे उपस्थित आ–हेत.सत्कारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विश्वचषकात भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. याचा संपूर्ण भारतीयांना अभिमान आहे. या विजयाने भारताचा गौरव वाढवला आहे. सुरुवातीच्या काही पराभवानंतर संघाने केलेली पुनरागमनाची कामगिरी उल्लेखनीय आहे. प्रत्येक खेळाडूने कुठल्या ना कुठल्या सामन्यात निर्णायक भूमिका बजावली. प्रशिक्षक आणि संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करावे लागेल. या संघातील एकजूट आणि संघभावना महत्व–ाची असून यामुळे विजय मिळविणे शक्य झाले.

स्मृती मानधना सध्या भारतातील आयकॉनिक खेळाडूंमध्ये गणली जाते. तिचा सुरुवातीपासून ते आजपर्यंतचा प्रवास उल्लेखनीय आहे. ती लवकरच दहा हजार धावांचा टप्पा गाठेल. जेमिमाह रॉड्रिग्ज ने ही सेमीफायनलमध्ये अप्रतिम खेळी सादर केली. राधा यादवने संघर्षमय प्रवास करत आपले अस्तित्व निर्माण केले असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ऑलिम्पिक मध्ये भारतीय महिला संघ विजय मिळवेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी संघासाठी घेतलेली मेहनत आणि क्रिकेटमधील त्यांची कामगिरी प्रेरणादायी आहे. क्रिकेटला लोकप्रिय करणाऱ्या जुन्या पिढीतील सर्व खेळाडूंमुळे आज क्रिकेट या उंचीवर पोहोचले आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांचेही अभिनंदन करताना ते महणाले की, महिला क्रिकेटला त्यांनी स्वतंत्र ओळख आणि दर्जा मिळवून दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, महिला क्रिकेटच्या दृष्टीने हा एक ऐतिहासिक क्षण आहे. पद्मश्री डायना एडल्जी यांनी लावलेले रोपटे आज मोठे झाले आहे. ग्रामीण भागातील मुलींना संधी मिळाली तर त्या जागतिक स्तरावर यश प्राप्त करू शकतात हे या क्रिकेट संघातील खेळाडूंनी सिद्ध केले आहे.या विजयाने क्रीडा रसिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, भविष्यातही आपण असेच यश प्राप्त कराल अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केली.

स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव, प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी आभार मानत, सर्व संघाचे आणि क्रिकेट प्रेमींचे आभार मानले. बीसीसीआयच्या अखंड पाठिंब्यामुळे आणि खेळासाठी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे हे शक्य झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

# सूर्यकुमार यादव भडकला! लाईव्ह सामन्यात शिवम दुबेला झापले, नेमके काय घडले?

दिल्ल–भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ५ टी–२० सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील चौथ्या सामन्यात भारतीय संघाने दमदार विजयाची नोंद केली. यासह मालिकेत २–१ ने आघाडी घेतली. या सामन्यात संघाचा कर्णधाा सूर्यकुमार यादवला फलंदाजीत हवी तशी कामगिरी करता आली नाही. तो अवघ्या २० धावा करत माघारी परतला. दरम्यान या सामन्यात तो आपल्या फलंदाजीमुळे नव्हे, तर वेगळ्याच कारणाम ुळे चर्चेत आला आहे.सूर्यकुमार यादव हा आपल्या कूल आणि मजेशीर स्वभावासाठी ओळखला जातो. तो सहसा संघातील खेळाडूंवर रागावताना दिसत नाही. पण चौथ्या टी–२० सामन्यादरम्यान तो संघातील खेळाडूंवर रागावताना दिसला. तर झाले असे की, १२ वे षटक टाकण्यासाठी शिवम दुबे गोलंदाजीला आला. या षटकात गोलंदाजी करताना त्याने टीम डेव्हिडला बाद करत म ाघारी धाडलं. त्याने चांगली गोलंदाजी करत मार्कस स्टोइनिसला २ निर्धाव चेंडू टाकले. त्यामुळे मार्कस स्टोइनिसवरील दबाव वाढत चालला होता. पण षटकातील शेवटी त्याने ऑफ स्टंपच्या बाहेर शॉर्ट चेंडू टाकला. या चेंडूवर स्टोइनिसने बॅकवर्ड पॉईंटच्या दिशेने चौकार मारला. हे सूर्यकुमार यादवला मुळीच आवडलं नाही. त्यामुळे तो शिवम दुबेवर संताप व्यक्त करताना दिसला.पण स्टोइनिस फार काही करू शकला नाही. ऑस्ट्रेलियाला हा सामना जिंकण्यासाठी १६८ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना सलामीला आलेल्या मिचेल मार्शने ३० धावांची खेळी केली.

# शेवटच्या सामन्यात टीम इंडियाची प्लेइंग ११ बदलणार? कोणाला संधी मिळणार?

**गाबा :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या टी –२० मालिकेतील शेवटचा सामना आज रंगणार आहे. दरम्यान या साम न्यासाठी कशी असेल भारताची प्लेइंग ११? जाणून घ्या.

भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ५ टी –२० सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील ४ सामने झाल्यानंतर भारतीय संघ २–१ ने पुढे आहे. तर मालिकेतील शेवटचा सामना आज गाबाच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. भारतीय संघाला ही मालिका जिंकण्याची सुवर्णसंधी आहे. जर सामना गमावला तरीदेखील मालिका २–२ ने बरोबरीत सुटणार आहे. दरम्यान या सामन्यासाठी भारतीय संघांच्या प्लेइंग ११ मध्ये मोठे बदल पाहायला मिळू शकतात. कोणत्या ११ खेळाडूंना स्थान मिळू शकते? जाणून घ्या.

संजू सॅमसनला संधी मिळणार ?

यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसनला या सामन्यासाठी प्लेइंग ११ मध्ये संधी दिली जाऊ शकते. यष्टिरक्षक जितेश शर्मा किंवा मग तिलक वर्माला विश्रांती देऊन हा निर्णय घेतला जाऊ शकतो. आशिया चषक स्पर्धेत दमदार कामगिरी करणाऱ्या तिलक वर्माला या मालिकेत हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. यासह आणखी काही मोठे बदल केले जाऊ शकतात. नितीश कुमार रेड्डी किंवा रिंकू सिंग यांनाही प्लेइंग ११ मध्ये खेळण्याची संधी दिली जाऊ शकते. असं झाल्यास शिवम दुबे किंवा मग वॉशिंग्टन सुंदरला विश्रांती दिली जाऊ शकते.

या सामन्यासाठी अशी असू शकते भारतीय संघाची प्लेइंग ११:

अभिषेक शर्मा, शुबमन गिल, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा/रिंकू सिंग, जितेश शर्मा/संजू सॅमसन (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शिवम दुबे/नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह/हर्षित राणा.



## सोलापूर-अजमेर विशेष गाड्यांच्या सेवा रेल्वेकडून अतिरिक्त ६ फेऱ्यांसाठी सुरु राहणार

**सोलापूर/प्रतिनिधी** : सोलापूर आणि अजमेर दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवा रेल्वेकडून अतिरिक्त ६ फेऱ्यांसाठी सुरू राहणार आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

सोलापूर-अजमेर साप्ताहिक विशेष (६ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०९६२७ अजमेर-सोलापूर साप्ताहिक विशेष गाड्या ०५.११.२०२५ पर्यंत चालवण्यासाठी अधिसूचित करण्यात आली होती. ती आता १२.११.२०२५ ते २६.११.२०२५ पर्यंत दर बुधवारी चालवण्यात येणार आहेत. (३ फेऱ्या) - ट्रेन क्रमांक ०९६२८ सोलापूर-अजमेर साप्ताहिक विशेष गाड्या ०६.११.२०२५ पर्यंत चालवण्यासाठी अधिसूचित करण्यात आली होती. ती आता १३.११.२०२५ ते २७.११.२०२५ पर्यंत दर गुरुवारी चालवण्यात येणार आहेत. (३ फेऱ्या) वरील गाड्यांच्या संरचनेत आणि थांब्यात कोणताही बदल होणार नाही.

आरक्षण आणि बुकिंग: विशेष शुल्कासह विशेष गाड्यांचे आरक्षण ०९.११.२०२५ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर सुरू होईल. अनावश्यक डब्यांचे बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि णढड अ‍ॅपद्वारे देखील करता येईल. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात आली आहे. या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES अ‍ॅप डाउनलोड करा.

## विद्यार्थ्यांच्या बस समस्यांवर तोडगा निघावा; अभाविपचे विभाग नियंत्रकांना निवेदन

**धाराशिव/प्रतिनिधी** : गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांना बस संदर्भात होत असलेल्या विविध समस्यांबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) धाराशिवच्या वतीने विभाग नियंत्रकांना निवेदन देण्यात आले.या निवेदनात विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे मांडण्यात आल्या आहेत.सकाळी ९ वाजता धाराशिव शहरातून तसेच इतर गावातून तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जाणाऱ्या बसेस तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उड्डाणपुलाखाली थांबवाव्यात. तसेच सायंकाळी ५ नंतर तुळजापूरवरून येणाऱ्या बसही त्याच ठिकाणी थांबाव्यात.तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था महाविद्यालयासमोर बसथांबा उपलब्ध करून त्या ठिकाणी बस थांबाव्यात, अशीही मागणी करण्यात आली. बसथांबा असतानाही काही बसचालक तेथे थांबत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करत, अशा चालकांवर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी अभाविपकडून करण्यात आली आहे.या मागण्या दोन दिवसांच्या आत सोडविण्यात याव्यात, अन्यथा विद्यार्थ्यांच्या तीव्र रोषाला प्रशासनाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या वेळी धाराशिव जिल्हा सहसंयोजक अक्षय माळी, सहमंत्री जयराम गंभीरे, अजिंक्य वाघमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी** :महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ ही परीक्षा लातूर शहरातील ११ परीक्षा उपकेंद्रांवर रविवार, ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या कालावधीत होत आहे. त्याअनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या परीक्षा केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.लातूर शहरातील बार्शी रोडवरील दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड बीसीए, नांदेड रोडवरील यशवंत विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला, नारायणनगर येथील परिमल विद्यालय, खाडगाव रिंग रोड येथील श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, खाडगाव रोडवरील सरस्वती विद्यालय, दयाराम रोड येथील श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, शाहू चौक येथील ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खाडगाव रोड येथील श्रीमती सुशीलादेवी देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, सरस्वती कॉलनी येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, श्याम नगर येथील श्री केशवराज विद्यालय या उपकेंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. परीक्षा कालावधीत या परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये अपर जिल्हाधिकारी केशव नेटके यांनी परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देता येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करता येणार नाही. शंभर मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसारमध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तींकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत त्यांचे परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. हे आदेश ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहतील.

## कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव मध्ये वंदे मातरम् या गीताचे गायन

बाभळगाव : आज वंदे मातरम या गीतास दीडशे वर्ष पूर्ण झाल्यामुळे कै. व्यंकटराव देशमुख महाविद्याय, बाभळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी केले. यावेळी प्रा.महारुद्र बिडवे, प्रा. सोपान डोपे, प्रा. विवेक कदम, ग्रंथपाल डॉ. महावीर कटके, प्रा. संदिपान चेवले यांची उपस्थिती होती. यावेळी वंदे मातरम या गीताच्या निर्मितीपासून ते आज दीडशे वर्षापर्यंतचा संपूर्ण इतिहास प्रा. हरिहर गायके यांनी मांडला आणि त्यानंतर सामूहिकरीत्या वंदे मातरम या गीताचे गायन करण्यात आले. उपस्थितांचे आभार प्रा. संतोष कल्याणकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वंदे मातरम् देशाच्या एकतेचा आवाज : अजित पाटील कव्हेकर

## वंदे मातरम्च्या जयघोषाने ट्युशन एरिया दुमदुमला





**लातूर/प्रतिनिधी** : वंदे मातरम गीतातून राष्ट्रीयत्वाची भावना आणि मातृभूमीचे प्रेम जागृत होते. हे गीत कोणत्याही धर्म आणि भाषेशी संबंधित नसून याचा धार्मिकतेशी संबंध लावण्याची चूक मागील काळात करण्यात आलेली आहे. त्यामुळे वंदे मातरम हे गीत दाबण्याचा प्रयत्नही त्यावेळी करण्यात आलेला होता. मात्र वंदे मातरम हे आपल्या देशाच्या एकतेचा आवाज असून याचा जयघोष आणि उद्घोष सातत्याने व्हावा असे आवाहन भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले. बकिमचंद्र चटोपाध्याय लिखित वंदे मातरम या राष्ट्रगाणला १५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल लातूर शहर जिल्हा भाजपच्या वतीने व आर.सी.सी., आय.आय.बी., विद्याआराधना यांच्या सहकार्यातून ट्युशन एरिया येथे ७,००० पेक्षा अधिक विधार्थ्यांच्या उपस्थितीत सामुहिक वंदे मातरम गायन करण्यात आले. यावेळी अजित पाटील कव्हेकर बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, निवडणूक प्रमुख डॉ.अर्चना पाटील चाकूरकर, प्रा.शिवराज मोटेगावकर, प्रा.सतीश पवार, प्रा.निळकंठ मीरकले, संजय लड्डा, माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, सरचिटणीस प्रवीण कस्तुरे, निखील गायकवाड, रागिणी यादव, संजय गिर, व्यंकटेश कुलकर्णी, महिला मोर्चा अध्यक्षा शीतल मालू, मंडल अध्यक्ष निर्मला कांबळे, सुरेश जाधव, राहुल भुतडा, काकासाहेब चौगुले, विशाल हावा पाटील, रोहित पाटील, सचिन सुरवसे, गोपाळ वांगे, राजकुमार गोजमगुंडे अनुसूचित मोर्चा अध्यक्ष पवन आल्टे, ओ.बी.सी. मोर्चा अध्यक्ष प्रमोद गुडे, सुरेश राठोड, श्रीकांत रांजणकर, प्रा.उदय देशपांडे, दिपक मठपती आदींची उपस्थिती होती. १८७५ मध्ये बकिमचंद्र चटोपाध्याय यांनी आपल्या आनंद मठ या कादंबरीतून वंदे मातरम हे गीत निर्माण केले असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि, वंदे मातरम या गीताने स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा अधिक जागृत करून क्रांतीकरांना व स्वातंत्र्यसेनानी यांना प्रेरित केले होते. त्यावेळी प्रत्येकाच्या हृदयात वंदे मातरम हे स्वातंत्र्य लढ्याच्या शक्तीचे स्त्रोत बनले होते. आजही प्रत्येक भारतीयांच्या अंतकरणात वंदे मातरम वसलेले असून हे राष्ट्र अभिमानाचे प्रतिक आहे. मात्र याच वंदे मातरम गीताचा संबंध धार्मिकतेशी जोडण्याची चूक त्यावेळी काँग्रेसने केली असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. या कारणाने वंदे मातरमला दाबण्याचा प्रयत्नही सातत्याने त्यावेळी झालेला होता. मात्र वंदे मातरम हे राष्ट्रभक्तीचे आणि मातृभुमीप्रती प्रेम व्यक्त करण्याचे ऊर्जास्त्रोत असून याचा धार्मिकतेशी कोणताही संबंध नसल्याचे सांगितले आहे. आजही वंदे मातरम प्रत्येक भारतीयांच्या मनामनात आणि कणाकणात वसलेले असून वंदे मातरम हे गीत राष्ट्रीय एकतेचा आवाज असल्याचे सांगून याचा जयघोष आणि उद्घोष सातत्याने व्हावा असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी आसावरी जोशी यांच्यासमवेत ७,००० पेक्षा अधिक विद्यार्थी व उपस्थित भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिकांनी सामुहीकरित्या वंदे मातरमचे गायन केले. यानंतर वंदे मातरमच्या जयघोषाने संपूर्ण ट्युशन एरिया दुमदुमला गेला. यावेळी प्रा.शिवराज मोटेगावकर, प्रा.सतीश पवार, प्रा.निळकंठ मीरकले, संजय लड्डा व आसावरी जोशी यांचे विशेष सहकार्य लाभल्या बद्दल शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी माजी स्थायी समिती सभापती अ‍ॅड. दिपक मठपती, शोभा पाटील, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, वर्षा कुलकर्णी, मीना भोसले, प्रवीण घोरपडे, शिरीष कुलकर्णी, शीतल पाटील, किशन बडगिरे, मोहसीन शेख, अमजद पठाण, अनिल पतंगे, विनय जाकते, श्रीराम कुलकर्णी, भरत भोसले, धनंजय हाके, गणेश गवारे, राजन सोनवणे, मधुसूदन पारीख, शामसुंदर मानधना, गणेश हेड्डा, संजय सूर्यवंशी, सीमा करपे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ५८ व्या अखिल भारतीय रेल्वे शुटिंग चॅम्पियनशिपमध्ये मध्य रेल्वेने विजेतेपद पटकावले



**मुंबई/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेने ५८ व्या अखिल भारतीय रेल्वे शूटिंग चॅम्पियनशिप २०२५-२६ मध्ये विजेतेपद पटकावले. १ ते ५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आसनसोल येथील चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स (CLW) द्वारे आयोजित चॅम्पियनशिपमध्ये मध्य रेल्वेच्या नेमबाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली. या प्रतिष्ठित स्पर्धेत विविध विभागीय रेल्वे संघांच्या एकूण १७ संघांनी सहभाग घेतला.

मध्य रेल्वेच्या नेमबाजांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत वैयक्तिक तसेच सांघिक गटांमध्ये सर्वोच्च स्थान पटकावले.

मध्य रेल्वेच्या या उल्लेखनीय कामगिरीचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

वैयक्तिक कामगिरी

* ५० मीटर रायफल थ्री पोझिशन: पंकज मुखेजा (CCTC, पुणे) - सुवर्णपदक * १० मीटर एअर रायफल: शाहू माने (वरिष्ठ लिपिक, कल्याण) - सुवर्णपदक २५ मीटर पिस्तुल स्पर्धा: * सुमेधकुमार देवलालीवाला (उप. सीटीआय, पुणे) - सुवर्णपदक * पायल खत्री (कनिष्ठ लिपिक, डीआरएम (बीबी)) - सुवर्णपदक * रिया थत्ते (कनिष्ठ लिपिक, सीडब्ल्यूएम (परेल)) - रौप्यपदक

५० मीटर प्रोन स्पर्धा:

* शाहू माने (वरिष्ठ लिपिक, कल्याण) - रौप्यपदक

* पंकज मुखेजा (CCTC, पुणे) - कांस्यपदक

सांघिक निकाल

* ५० मीटर रायफल थ्री पोझिशन: रौप्यपदक * ५० मीटर प्रोन स्पर्धा: सुवर्णपदक * १० मीटर एअर रायफल: रौप्यपदक

* २५ मीटर पिस्तुल स्पर्धा: सुवर्णपदक

* १० मीटर एअर पिस्तुल स्पर्धा: सुवर्णपदक

सांघिक तसेच वैयक्तिक गटांमधील सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर मध्य रेल्वेने एकूण विजेतेपदाचा चषक पटकावत रेल्वे क्रीडा क्षेत्रातील आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले.

## कल्याणमधील रिंगरोड प्रकल्प लवकर होणार पूर्ण! आयुक्तांचे आश्वासन

कल्याण : शहरातील वाहतूककोंडीवर पर्याय म्हणून कल्याणमध्ये रिंगरोड तयार करण्यात येत आहे. या प्रस्तावित रिंगरोडचे उर्वरित काम वेगाने पूर्ण करण्यासाठी या मार्गातील अडथळ्याची महापालिका आयुक्तांसह 'एमएमआरडीए' च्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली. यावेळी पुढील दोन महिन्यांत सगळे अडथळे दूर झाल्यास सात महिन्यांत दुर्गाडी ते मोठागाव माणकोली या सर्वात मोठ्या टप्प्याचे काम पूर्ण करून देण्याचे आश्वासन 'एमएमआरडीए' कडून देण्यात आले.

मागील अनेक वर्षांपासून कल्याण, डोंबिवली शहरांतील वाहतूककोंडी फोडण्यासाठी प्रस्तावित रिंगरोडचे काम सुरू आहे. या कामाचा वेग वाढवून नागरिकांना लवकरात लवकर हा रोड वापरण्यास द्यावा अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत दिल्या होत्या. त्यामुळे आता हे काम लवकर मार्गी लावण्यासाठी आयुक्तांनी रिंगरोडची पाहणी केली.

# 'वंदे मातरम्' हे स्वातंत्र्यलढ्यातील शंखघोष डॉ. संदीपान जगदाळे

## हजारो विद्यार्थ्यांच्या "वंदे मातरम्" जयघोषाने औसा दुमदुमले






**लातूर/प्रतिनिधी** : कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेल्या "वंदे मातरम्" या राष्ट्रगीताच्या सार्धशती (१५० वर्षे पूर्ण) निमित्त ७ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मा. अ‍ॅड. मंगल प्रभात लोढा व सांस्कृतिक कार्य मंत्री मा. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने औसा येथेही भव्य कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात वंदे मातरम् सार्धशती समारोह समितीचे सदस्य डॉ. संदीपान जगदाळे यांनी मुख्य वक्ता म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना राष्ट्रभक्तीचा संदेश दिला.

डॉ. जगदाळे आपल्या प्रभावी भाषणात म्हणाले की, "वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर राष्ट्रभक्तीचा जीवंत मंत्र आहे. हे शब्द ऐकताच प्रत्येक भारतीयाच्या अंतर्मनात देशप्रेम जागृत होते. 'वंदे मातरम्' म्हणजे केवळ घोष नाही; ती आपल्या संस्कृतीची आराधना आहे. आपल्या भूमीला माता मानून तिची सेवा करणे हेच या जयघोषाचे तत्त्व आहे." भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक आदी क्रांतीकारकांनी या गीतातून प्रेरणा घेतली, हे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना आवाहन करत त्यांनी सांगितले की, "पर्यावरण स्वच्छ ठेवणे, प्रामाणिक काम करणे, स्वदेशी वस्तू वापरणे हेच खरे 'वंदे मातरम्' आहे." धर्म, भाषा, प्रांत काहीही असो, भारत माता एकच आहे, म्हणून "वंदे मातरम्" म्हणजे एकतेचा जयघोष आहे, असे ते म्हणाले. समारोपात त्यांनी युवकांना नवभारताच्या निर्मितीसाठी कार्यतत्पर राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी "वंदे मातरम्" चा सामूहिक जयघोष करून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुक्तेश्वर संस्थेचे अध्यक्ष श्री. औटी सर होते, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या कु. इंदिरा रणभिडकर यांनी केले. या वेळी हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी सामूहिक "वंदे मातरम्" गायन करून परिसर देशभक्तीने दुमदुमवला.

या कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी श्री. राठोड सर, गटविकास अधिकारी श्री. राऊत सर, पी. आय. श्री. माळवतकर सर, बी अँड सी विभागाचे श्री. सूर्यवंशी सर तसेच इतर प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि आयएमसी सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. सचिन डोंगरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांचे विशेष योगदान लाभले.

## दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी नोंदणी अनिवार्य

**लातूर/प्रतिनिधी** : दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांचे अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. दिव्यांग क्षेत्रात अनेक संस्था विना नोंदणी कार्य करीत असले बाबत निर्दशनास आढळून आले आहे. त्यामुळे ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्य करीत आहेत, त्यांना कायदयानुसार नोंदणी करणे बंधनकारक असल्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दिव्यांग क्षेत्रात कार्य करु इच्छिणाऱ्या सर्व संस्थानी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करून घ्यावी, अन्यथा त्या संस्थावर कार्यवाही करण्यात येणार आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग कल्याण आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले असून त्यांच्यामार्फत नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ५१ व ५२ नुसार नोदणी करणे अनिवार्य आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार लातूर जिल्हातील ज्या संस्थेस दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाचे आहे, त्या संस्थानी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यत नोंदणी करुन घेणे बंधनकारक आहे. नोंदणीचा प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परीषद, लातूर यांच्याकडे सादर करावा. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ९१ नुसार विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थेवर कार्यवाही करण्यात येणार आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्यावतीने विद्यार्थी दिवस साजरा..



धाराशिव (प्रतिनिधी)-फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने विद्यार्थी दिवस साजरा करण्यात आला. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा दि.०७ नोव्हेंबर १९०० रोजी शाळेचा पहिला दिवस असुन या दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य सरकार हा दिवशी विद्यार्थी दिवस म्हणुन साजर करते, विद्यार्थ्यांना महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्पृश्य अस्पृश्य अशा सामाजिक समस्यांवर मात करून शिक्षण घेतले,भारतीय संविधान लिहिले,दिन दलितांच्या उद्धारासाठी अहोरात्र कष्ट घेतले,माणुस म्हणून जगण्याचा अधिकार दिला,अशा महामानवाच्या स्मृतीस उजाळा देत आजच्या विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घ्यावी या उद्देशाने हा विद्यार्थी दिवस साजरा केला जातो, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार व फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्यासंत

नियोजित जागेतील तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले, यावेळी फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीचे अध्यक्ष गणेश रानबा वाघमारे, सचिव प्रवीण जगताप, सहसचिव संग्राम बनसोडे,कोषाध्यक्ष अंकुश उबाळे, मार्गदर्शक बलभीम कांबळे,सदस्य अतुल लष्करे,अनु. जाती,जमाती कर्मचारी संघटनेचे सचिव राजेंद्र धावारे,वासुदेव वेदपाठक, मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अशोक बनसोडे,मा.डावकरे,अरुण बनसोडे,दलित मित्र विजय गायकवाड, साहित्यिक पंडित कांबळे अन्य इतर उपस्थित होते.

# औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादीचे नुतनीकरण सुरू – मतदारांना नाव तपासण्याचे आवाहन

धाराशिव दि. ६ नोव्हेंबर (जिमाका ) भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर विधान परिषद मतदारसंघाची मतदार यादी नुतनीकरण प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.मतदार नोंदणी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून दि. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांच्या आधारे प्रारंभिक मतदार यादी दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

तसेच प्रारंभिक यादीबाबत दावे व हरकती सादर करण्यासाठी मतदारांना संधी देण्यात आली असून त्यावर अंतिम निर्णय घेऊन दि.३० डिसेंबर २०२५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

या संदर्भात सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी मंजुषा किस्कार यांनी सांगितले की,विधानपरिषदेच्या सदस्यपदी असलेली जागा डिसेंबर २०२६ मध्ये रिक्त होणार आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५० मधील तरतुदीनुसार मतदार याद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा व नावे समाविष्ट करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

मतदारांना नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी आपले नाव,दुरुस्ती,नव्याने समावेश किंवा वगळणे यासाठी अर्ज करता येईल.या कालावधीत ऑफलाइन तसेच ऑनलाइन माध्यमातून देखील अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध असेल.

सर्व पात्र पदवीधर मतदारसंघातील मतदारांनी आपल्या नावाची खातरजमा करून आवश्यक असल्यास सुधारणा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर बंदी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

धाराशिव दि. ६ नोव्हेंबर (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर केला आहे.कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने, जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

मा. भारत निवडणूक आयोगाच्या १३ मार्च १९९६ आदेशानुसार कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने निवडणूक घोषित झाल्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी केला आहे.या आदेशात नमूद करण्यात आले आहे की,शासकीय कर्तव्य पार पाडणारे दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी/ कर्मचारी आणि बँकांच्या सुरक्षेसाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना वगळता,इतर सर्व परवानाधारकांना त्यांच्या परवान्यांनुसार असलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यास या आदेशान्वये बंदी घालण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी यांनी आदेशात नमूद केले आहे की,प्रत्येक शस्त्र परवाना धारकास स्वतंत्र नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकणे सद्यस्थितीत शक्य नसल्यामुळे एकतर्फी आदेश जारी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. हा आदेश जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद हद्दीत निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ३ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू राहणार आहे.

# शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लाकडी दांडक्याने मारहाण

धाराशिव(प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत , पार्वती राम साळुंके, पुजा , इतर एक इसम रा. जुना बस डेपो धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.०२.११.२०२५ रोजी निलेश यांचे जुना बस डेपो धाराशिव येथे फिर्यादी बिभीषन मारुती लोंढे, वय ३६ वर्षे, रा. साठे चौक जवळ धाराशिव ता. जि. धाराशिव यांना नमुदानी भावाचे मोबाईलवर शिवगीळ केल्याने ते विचारण्यास जाण्याचे कारणावरुन जातीवाचक शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लाकडी दांडक्याने मारहाण करुन जखमी केले. तसेच फिर्यादीचे भावास मारहाण करुन जखमी केले.

अशा मजकुराच्या फिर्यादी बिभीषन लोंढे यांनी दि.०५.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे धाराशिव शहर येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध सकाळी ६ ते रात्री १० पर्यंतच परवानगी,जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

धाराशिव (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर केला असून, कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध लागू केले आहेत.

भारत निवडणूक आयोगास भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ खाली प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून,निवडणुकीच्या काळात लाऊडस्पीकर (ध्वनीक्षेपक) वापरण्यावर मर्यादा घालण्याचे निर्देश दिले आहेत.सर्व संबंधितांना स्वतंत्रपणे नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश जारी करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी नमूद केले आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद हद्दीत कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस स्टेशन अधिकाऱ्यांची रीतसर परवानगी घेऊन करता येईल.तथापि, ध्वनीक्षेपक वापरत असताना वाहन चालू ठेवता येणार नाही.

सर्व प्रकारच्या ध्वनीक्षेपकांचा वापर वाहनावर बसवून किंवा इतर कोणत्याही प्रकारे करता येईल,परंतु तो परवानगीच्या वेळेतच म्हणजे सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंतच वैध राहील.सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी,निवडणुकीचे उमेदवार किंवा ध्वनीक्षेपकाचा वापर करणाऱ्या व्यक्तींनी त्या वापराचे परवानगी विवरण संबंधित मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी तसेच जवळच्या पोलीस स्टेशनला सादर करणे बंधनकारक असेल.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस भारतीय न्याय संहितामधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र ठरवले जाईल,असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.हा बंदी आदेश ४ नोव्हेंबर २०२५ पासून ३ डिसेंबर २०२५ पर्यंत जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद हद्दीत लागू राहील.

# नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यालये व विश्रामगृह परिसरात मिरवणुका, सभा,घोषणांवर बंदी जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यालये व विश्रामगृह परिसरात मिरवणुका, सभा,घोषणांवर बंदी जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

धाराशिव,दि.६ नोव्हेंबर (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर केला आहे.कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, धाराशिव जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी सभा,मिरवणुका व निवडणूक प्रचार यासंबंधीचे नियमबद्ध नियंत्रण आवश्यक असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सदर पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार,निवडणुकीच्या कालावधीत म्हणजेच दि.४ नोव्हेंबर २०२५ ते दि.३ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील नगरपरिषद हद्दीत खालील बाबींवर बंदी घालण्यात आली आहे.कोणत्याही प्रकारची मिरवणूक,मोर्चा,आंदोलन, निदर्शने किंवा उपोषण आयोजित करणे.कोणत्याही प्रकारची घोषणा देणे,वाद्य वाजविणे किंवा गाणे म्हणणे.कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणे.

हा आदेश जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये,तहसील कार्यालये तसेच सर्व शासकीय विश्रामगृहे या परिसरांमध्ये लागू राहील.हा आदेश दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी काढला असून,तो संपूर्ण जिल्ह्यात नगरपरिषद हद्दीत लागू राहील.

# नगरपरिषद निवडणुकीदरम्यान दहा पेक्षा जास्त वाहनांच्या ताफ्यावर बंदी : जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

धाराशिव,दि. ६ नोव्हेंबर (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर केला असून, कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. धाराशिव जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने निवडणुकीदरम्यान वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध करणारा आदेश जारी केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या निर्देशानुसार नमूद केले आहे की, कोणत्याही परिस्थितीत सुरक्षेसाठी असलेल्या मोटारगाड्या, वाहने किंवा मोटारसायकल यांच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक वाहने नसावीत.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मोठ्या वाहनताफ्यांवर निर्बंध घालण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून त्यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, कोणत्याही वाहनांच्या ताफ्यामध्ये दहापेक्षा जास्त मोटारगाड्या, मोटारसायकली अथवा वाहने (उरी/तशहळलश्रशी/इळज्ञशी) वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.हा आदेश जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद हद्दीत लागू राहील आणि निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ३ डिसेंबर २०२५ पर्यंत प्रभावी असेल.

# रस्त्याची वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे बाबत शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे निवेदन



धाराशिव (प्रतिनिधी)- शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक धाराशिव यादरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना होत असलेल्या प्रचंड गैरसोयीबद्दल व सदरील रस्त्यावरील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी पोलीस निरीक्षक साहेब वाहतूक नियंत्रण शाखा धाराशिव यांना निवेदन देण्यात आले. या चालू रस्त्यावरील कामामुळे एकेरी वाहतूक सुरू असल्यामुळे दोन्ही बाजूंनी वाहने एकत्र आल्याने वारंवार ट्रॅफिक ज्यामची समस्या उद्भवत आहे. तसेच या परिसरात दररोज छोटे मोठे अपघात घडत आहेत. सामान्य नागरिक महिला शाळकरी मुले यांना या रस्त्यावरील ट्रॅफिक ज्याममुळे प्रचंड मनस्ताप व हाल सहन करावे लागत आहेत. अशा वाहतूक व्यवस्थेमुळे आगामी काळात मोठा अपघात होऊन जीवित व मालमत्तेची हानी होण्याची दाट शक्यता आहे. तरी पोलीस वाहतूक शाखा विभागाने तातडीने एकेरी वाहतूक सुरू करावी तसेच वाहतूक इतर मार्गाने वळवावी या ठिकाणी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी व जनसामान्यांना होणाऱ्या त्रासापासून सुटका करावी अन्यथा समितीच्या वतीने सनदशीर मार्गाने आंदोलन करण्यात येईल अशा प्रकारची निवेदन देण्यात आले. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे शहर उपाध्यक्ष श्री आकाश भोसले सचिव श्री भैरवनाथ रणखांब, तालुकाध्यक्ष श्री मनोज मोरे रिक्षा समिती कार्याध्यक्ष श्री योगेश अतकरे श्री आशिष क्षिरसागर श्री दत्ता साळुंके श्री अमोल साळुंके श्री अविनाश रणखांब श्री काका कदम श्री विश्वंभर आगळे श्री नेताजी जाधव इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

# बायोमॅट्रिक'मुळे सोयाबीन नोंदणीत शेतकऱ्यांची अडचण

भूम यावर्षी सोयाबीन शासकीय खरेदीसाठी बायोमेट्रिक (अंगठा) पडताळणी अनिवार्य केल्याने भूम तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नोंदणी केंद्रांवर तासन्तास प्रतीक्षा, इंटरनेटची दिरंगाई आणि यंत्रणा वारंवार बंद पडल्याने प्रक्रिया संथगतीने सुरू आहे. ग्रामीण भागातील शेतकरी शहरात येऊन दिवसभर थांबत आहेत. विशेषतः महिला आणि वृद्ध शेतकऱ्यांना यातून त्रास सहन करावा लागत आहे; काही वृद्ध शेतकऱ्यांचे अंगठ्याचे स्कॅन वारंवार फेल होत असल्याने त्यांची अडचण अधिकच वाढली आहे.

मागील वर्षी सातबारा, आठअ, आधार व बँक पासबुकच्या आधारे नोंदणी होत होती, मात्र यंदा बायोमेट्रिक पडताळणीमुळे प्रक्रिया क्लिष्ट झाली आहे. दररोज मर्यादित शेतकऱ्यांचीच नोंदणी होत असल्याने शेकडो शेतकरी प्रतीक्षेत आहेत. रब्बी हंगामाचे काम सुरू असताना दिवसभर नोंदणीसाठी थांबावे लागणे, ही शेतकऱ्यांची मुख्य नाराजी आहे. सरकारने 'ई-समृद्धी' पद्वारे मोबाईल नोंदणीची सुविधा दिली असली, तरी त्यात फेस अथवा अंगठा अपलोड करावा लागत असल्याने नेटवर्क नसलेल्या भागात ती प्रक्रिया अडकते. तालुक्यातील अनेक गावांत मोबाईल नेटवर्कचाच प्रश्न असल्याने शेतकरी त्रस्त आहेत.

स्थानिक शेतकरी व संघटनांकडून अंगठा पडताळणी सक्तीचा निर्णय मागे घेऊन नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याची मागणी होत आहे. शासनाने तातडीने आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या नाहीत, तर शेतकऱ्यांचा रोष ओढवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649